सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ७३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २३ एप्रिल २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## सर्वसामान्यांच्या खिशावर पडणार भार
# पेट्रोल-डिझेल थेट २८ रुपयांनी महागणार?
## निवडणुकीनंतर देशात इंधन दरवाढीचा शॉक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ नवी दिल्ली**

देशात सध्या विधानसभा निवडणुकांचे वारे वाहत आहेत. राजकीय सभा आणि आरोप-प्रत्यारोपांच्या फैरींनी वातावरण तापले असतानाच, सर्वसामान्यांची चिंता वाढवणारी एक बातमी समोर येत आहे. जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे, भारतात लवकरच पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

गेल्या महिनाभरापासून पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक तेल बाजार कमालीच्या तणावाखाली आहे. पुरवठ्याचे प्रमुख मार्ग, विशेषतः 'होर्मुझची सामुद्रधुनी' येथील अस्थिरतेमुळे कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. ऊर्जा आयात करणाऱ्या अनेक देशांनी आधीच पेट्रोल-डिझेलचे दर वाढवले असताना, भारतात मात्र तेल विपणन कंपन्यांनी किमती स्थिर ठेवल्या आहेत. मात्र, हा दिलासा तात्पुरता असण्याची शक्यता आहे.

देशांतर्गत ब्रोकरेज फर्म 'कोटक इन्स्टिट्यूशनल इक्विटीज'ने आपल्या ताज्या अहवालात खळबळजनक अंदाज वर्तवला आहे. अहवालानुसार, सध्याच्या




विधानसभा निवडणुकांमुळे इंधनाचे दर रोखून धरण्यात आले आहेत. २९ एप्रिल रोजी मतदानाचा शेवटचा टप्पा पार पडल्यानंतर या दरांमध्ये मोठी वाढ होऊ शकते. कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल १२० डॉलरच्या आसपास पोहोचल्यास, तेल कंपन्यांना आपले नुकसान भरून काढण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर २५ ते २८ रुपयांची वाढ करावी लागेल, असे ब्रोकरेजने म्हटले आहे.दरम्यान, इराण, अमेरिका आणि पश्चिम आशियातील देशांमधील संवाद तुटल्यामुळे बाजारात अनिश्चितता आहे. जर ही परिस्थिती लवकर निवळली नाही, तर पुरवठा साखळी विस्कळीत होऊन जागतिक बाजारात कच्च्या तेलाचा तुटवडा निर्माण होऊ शकतो. याचा थेट परिणाम भारतीय ग्राहकांच्या खिशावर होणार आहे. तेल कंपन्या सध्या सोसत असलेले नुकसान भरून काढण्यासाठी निवडणुकीनंतर दरवाढीचा कठोर निर्णय घेण्याची दाट शक्यता आहे.

### भारतासमोर मोठी आव्हाने

भारत आपल्या गरजेच्या ८० टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो. आंतरराष्ट्रीय बाजारात किमती वाढल्याचा थेट परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होतो. आकडेवारी नुसार, मार्च आणि एप्रिलमध्ये भारताने कच्च्या तेलाची आयात १२ ते १५ टक्क्यांनी कमी केली असूनही, वाढलेल्या किमतींमुळे भारताचे आयात बिल दररोज १९० ते २१० दशलक्ष डॉलर्सनी वाढले आहे. म्हणजेच, कमी तेलासाठी भारताला जास्त परकीय चलन मोजावे लागत आहे.

## मतदान करताना
# सुनेत्रा पवार भावुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३बारामती-** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीमध्ये पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणूक लढवत आहेत. सुनेत्रा पवार यांच्याविरोधात २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अतिशय भावनिक वातावरणात सुनेत्रा पवार यांनी कुटुंबासह मतदानाचा अधिकार बजावला. पार्थ पवार, जय पवार, सुप्रिया सुळे, रेवती सुळे, श्रीनिवास पवार आणि शर्मिला पवार यांनी मतदान केले. अजित पवारांच्या आईंनी घरीच मतदानाचा अधिकार बजावला. यावेळी या सर्वांनी बारामतीकरांना मतदान करण्याचे आवाहन केले. आज सकाळी



काटेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यावेळी खासदार पार्थ पवार आणि जय पवार यांनीही याच ठिकाणी मतदान करत लोकशाही प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवला. याप्रसंगी सर्व नागरिकांनी जबाबदारीची जाणीव ठेवून मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

# संजय गायकवाडवर गुन्हा दाखल करा- विजय वडेट्टीवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती-** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी देखील आमदार संजय गायकवाड यांच्या विधानावर टीका केली आहे. त्यांनी म्हटले की, लेखन स्वातंत्र्य, वाचन स्वातंत्र्य जे काही स्वातंत्र्य आहे ते संविधानाने दिले आहे. छत्रपती शिवरायांच्या बाबतीत कोणी चुकीचे लेखन केले असेल तर ते पापच आहे असे मी म्हणेल. परंतु, अशी धमकी जर कोणी दिली असेल तर ते चुकीचे आहे.

पुढे बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले, त्या आमदारावर गुन्हा दाखल केला पाहिजे आणि त्या प्रकाशकाला संरक्षण दिले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज हे सगळ्यांचे राजे होते. पानसरे यांनी लिहिलेले पुस्तक ते बरोबरच होते आणि म्हणूनच त्यांना धमकी मिळत आहे, असे वडेट्टी वार



म्हणाले.विजय वडेट्टीवार यांनी ट्विट करत म्हटले की, बहुजनांचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे वास्तव चित्रण कॉ. गोविंद पानसरे यांनी शिवाजी कोण होता? या पुस्तकात केले आहे. या पुस्तकाचे प्रकाशक तथा पुरोगामी विचारांचे कार्यकर्ते श्री. प्रशांत आंबी यांना सत्ताधारी पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी पानसरेचे जे हाल केले, तसे हाल करू अशी धमकी दिली आहे. छत्रपती शिवरायांचे विचार जनमानसात रुजवण्यासाठी कॉ. गोविंद पानसरे यांनी संपूर्ण जीवन समर्पित केले. अशा महान विचारवंताचा धर्मांध शक्तींनी खून केला, त्यांच्या गुन्हेगारांना अजूनही शिक्षा झालेली नाही.

असे असताना स्वतःला छत्रपती शिवरायांचे वंशज म्हणवून घेणाऱ्या आमदाराने त्यांच्याच हत्येचा दाखला देत इतरांना धमक्या देणे महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी लज्जास्पद आहे. धमकी देणाऱ्या आमदार विरोधात गुन्हा दाखल झाला पाहिजे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री स्वतःच गृहमंत्री आहेत. त्यांनी सत्तेसाठी अशा निर्बुद्ध आमदारांना पाठीशी न घालता तात्काळ कठोर कारवाई करावी, तसेच सत्ताधारी आमदाराकडून जीवाला धोका असल्यामुळे प्रशांत आंबी यांना पोलिस संरक्षण द्यावे अशी मागणी केली आहे.

## अशोक खरात प्रकरणात मोठी अपडेट,
# नाशिकमधील प्रसिद्ध डॉक्टरचं नाव समोर; गर्भपातासाठी करायचा मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ नाशिक-**

कायद्याचा बालेकिल्ला असलेल्या नाशिकमधील भोंदू अशोक खरातचा पाय दिवसेंदिवस अधिक खोलात अडकत चालला आहे. खरातवर आतापर्यंत ५ गुन्हे दाखल करण्यात आले असून यामध्ये लैंगिक शोषण, छळ, फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणात आता मोठी अपडेट समोर आली आहे. एका पीडित महिलेच्या गर्भपात प्रकरणी दाखल गुन्ह्यात चौकशीदरम्यान महापालिकेच्या डॉक्टरांमार्फत खरातला गर्भपाताच्या गोळ्या पुरवल्याच समोर आलं आहे. या खुलाश्यानंतर संबंधित डॉक्टरांची चौकशी होणार असून या प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, नाशिकमधील काही बड्या डॉक्टरांसह महापालिकेतील एका डॉक्टरनेही खरातला मदत केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, या डॉक्टरांमार्फत गर्भपाताच्या गोळ्या पुरवल्या जात असल्याचा गंभीर आरोपही पुढे आला आहे. यामुळे या



प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले असून संबंधित डॉक्टरांना लवकरच चौकशीसाठी बोलावले जाण्याची शक्यता आहे.

अशोक खरात हा स्वतःला अवतारी पुरुष असल्याचे सांगून महिलांना आपल्या जाळ्यात ओढत होता. वैयक्तिक अडचणी, कौटुंबिक समस्या किंवा आजारांवर उपाय सांगण्याच्या बहाण्याने तो महिलांचा विश्वास संपादन करत असे. त्यानंतर त्यांचे शारीरिक आणि मानसिक शोषण केल्याची धक्कादायक बाब तपासात उघड झाली आहे.

तपासादरम्यान असेही समोर आले आहे की, काही पीडित महिला गरोदर राहिल्यानंतर त्यांना गर्भपाताच्या गोळ्या दिल्या जात होत्या. या गोळ्या नेमक्या कुठून आणल्या जात होत्या, तसेच त्यामागे कोणते डॉक्टर किंवा सोनोग्राफी सेंटर्स सहभागी होते का, याचाही सखोल तपास सुरू आहे.

दरम्यान, या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता तपास यंत्रणांकडून वर्तवली जात आहे. समाजातील अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीचा गैरफायदा घेत महिलांचे शोषण करणाऱ्या अशा प्रकरणांवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे. डखढ चा तपास पुढे सरकत असताना या प्रकरणातील अनेक धक्कादायक बाबी अजून समोर येण्याची शक्यता आहे.

# इराणचा नवा डाव, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या इंटरनेट केबल निशाण्यावर?
## अमेरिकेचं टेन्शन वाढलं, अनेक देश ऑफलाईन होणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळं सुरुवातीला एलपीजी पुरवठा ठप्प झाला होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण सोबतची शस्त्रसंधी अनिश्चित काळासाठी सुरु ठेवली जाणार असल्याचं म्हटलंय. मात्र, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव कमी झालेला नाही. याशिवाय अमेरिका आणि इराण यांच्यात दुसऱ्या फेरीची शांतता चर्चा कधी होणार हे देखील स्पष्ट झालेलं नाही. अमेरिकेनं होर्मुझची सामुद्रधुनी अडवून धरली आहे. यामुळं इराणकडून देखील नवी खेळी करण्यात आली आहे. इराणच्या आयआरजीसीकडून आता होर्मुझच्या सामुद्रधुनीत असलेल्या इंटरनेट केबलला टार्गेट केलं जाऊ शकतं. इराणकडून समुद्रातील इंटरनेट केबलचं नुकसान करण्यात आल्यास भारतासह काही देशांमध्ये इंटरनेट ठप्प होऊ शकतं.

### इराणनं इंटरनेट केबलवर हल्ले केल्यास काय?

मीडिया रिपोर्टनुसार, होर्मुझची सामुद्रधुनी आणि लाल समुद्रात ऑप्टिकल फायबर केबलचं जाळं आहे. या केबलमधून बहुतांश देशांमध्ये इंटरनेट पोहोचतं. या भागातून जाणाऱ्या केबलमुळं आशिया, यूरोप आणि आफ्रिका या सारख्या देशांना इंटरनेट



कनेक्टव्हिटी मिळते. होर्मुझच्या सामुद्रधुनीत टाटा ढत्रछ गल्फ, गल्फ ब्रिज इंटरनॅशनल केबल सिस्टीम्स, ऋ-ङउजछ आणि --ए-१ या सारख्या मोठ्या कंपन्यांच्या केबल सिस्टीम्स आहेत. याद्वारे मोठ्या कंपन्यांच्या डेटा सेंटरला इंटरनेट कनेक्टिव्हिटी पुरवली जाते.

इराणनकडून होर्मुझची सामुद्रधुनी युद्ध थांबवण्यासाठी दबाव वाढवण्याचा भाग म्हणून बंद केली होती. आता अमेरिकेनं देखील होर्मुझच्या सामुद्रधुनीत नाकाबंदी केली आहे. या मार्गातून सागरी वाहतूक जवळपास बंद झाली आहे. इराणनं या मार्गात मॉइन्स देखील पेरले असल्याचे रिपोर्ट आले होते, त्यामुळं संकट वाढलं आहे. याशिवाय लाल समुद्रातील अल-मंडेब चामार्ग देखील सुरक्षित राहिला नव्हता.

मीडिया रिपोर्टनुसार इराणकडून अमेरिकेवर दबाव वाढवण्यासाठी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या इंटरनेट केबलला निशाणा केलं जाऊ शकतं. इंटरनेट केबलचं नुकसान झाल्यास त्याच्या दुरुस्तीला खूप वेळ लागू शकतो. सध्या होर्मुझमध्ये जहाजं जात नसून केबलचं नुकसान झाल्यास त्याच्या दुरुस्तीसाठी वेळ लागेल.

दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यातील दुसऱ्या टप्प्यातील शांतता चर्चेबाबत पाकिस्तान आशावीद असल्याचं दिसतं. मात्र, अमेरिका आणि इराण यांची चर्चेसाठी सहमती होताना दिसत नाही. याशिवाय इराणच्या आयआरजीसीकडून भारताकडे येणाऱ्या जहाजावर हल्ला करुन ते ताब्यात घेतल्याचं काल समोर आलं होतं. ते जहाज दुबईतून गुजरातकडे निघालं होतं.

## बंगालमध्ये अत्यंत चुरशीचा मुकाबला
# भाजप उमेदवाराला पळवून पळवून मारलं; मुर्शिदाबादमध्ये बॉम्बहल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ कलकत्ता.** पश्चिम बंगालमधील पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी चुरशीचा मुकाबला सुरु आहे. राज्यात अनेक ठिकाणी भाजप आणि तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते भिडल्याने मोठा तणाव निर्माण झाला. दक्षिण मिदनापूर येथील कुमारगंज मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे भाजपचे उमेदवार सुवेंदू सरकार यांच्यावर हल्ला झाला. व्हिडिओमध्ये सुवेंदू हल्लयातून वाचण्यासाठी पळताना दिसत आहेत. त्यांचा सुरक्षा रक्षक त्यांच्यासोबत आहे. असे असूनही, जमाव त्यांना मारहाण केली. हल्लेखोरांची ओळख अद्याप निश्चित झालेली नाही. वृत्तानुसार, निवडणूक आयोगाने व्हिडिओमध्ये दिसलेल्या सर्वांना तत्काळ अटक करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, राज्यभरातील अनेक ठिकाणी भाजप आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष झाल्याचे वृत्त आहे. अनेक ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याच्या तक्रारीही आल्या आहेत. पश्चिम बंगालमधील पहिल्या टप्प्यात १५२ जागांच्या आणि तामिळनाडूमधील सर्व २३४ जागांच्या पहिल्या टप्प्यासाठी मतदान सुरू आहे. सकाळी ११ वाजेपर्यंत बंगालमध्ये ४१.११ आणि तामिळनाडूमध्ये ३७.५६ टक्के मतदानाची नोंद झाली. बुधवारी रात्री उशिरा मतदान सुरू होण्यापूर्वी मुर्शिदाबादच्या नौदा येथे एक कच्चे बॉम्ब फेकण्यात आले. यात अनेक जण जखमी झाले. यानंतर, आम जनता उन्नयन पार्टीचे (एजेयूपी) प्रमुख हुमायून कबीर सकाळी घटनास्थळी पोहोचले, तेव्हा त्यांना विरोधाचा



सामना करावा लागला. त्यांचा टीएमसी कार्यकर्त्यांशी संघर्षही झाला आणि त्यानंतर त्यांनी धरणे आंदोलन केले. त्यांनी सांगितले की, पोलीस टीएमसी कार्यकर्त्यांविरुद्ध गुंडगिरी करत आहेत आणि त्यांच्या समर्थकांना मारहाण केली जात आहे. सिलिगुडीमध्ये मतदानादरम्यान भाजप आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये संघर्षही झाला. मालदा येथील एका मतदान केंद्रावर ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याने गोंधळ निर्माण झाला. लोकांनी निवडणूक अधिकाऱ्याला घेराव घालून आंदोलन केले. दरम्यान, सकाळपासून राज्यभरातील मतदान केंद्रांवर लांबच लांब रांगा लागल्या असून, त्यात महिलांची संख्या लक्षणीयरीत्या जास्त आहे. तामिळनाडूमध्येही अशीच परिस्थिती दिसून येत आहे.बंगालमधील मुख्य लढत टीएमसी आणि भाजप यांच्यात आहे. निवडणूक आयोग वेबकास्टिंगद्वारे (थेट निरीक्षण) मतदान केंद्रांवर देखरेख ठेवत आहे. राज्यातील उर्वरित १४२ जागांसाठी दुसऱ्या टप्प्यात २९ एप्रिल रोजी मतदान होईल आणि ४ मे रोजी निकाल जाहीर केला जाईल.

## संपादकीय ......

# दहशतवादाचा क्रूर चेहरा

*जम्मू-काश्मीरमधील पहलगामच्या बैसरन पठार येथे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या नृशंस दहशतवादी हल्ल्याला वर्ष पूर्ण झाले. खरे पाहता भारताने इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या रूपाने दोन पंतप्रधान दहशतवादी हल्ल्यांमध्ये गमावले आहेत. त्यांतून राष्ट्रविरोधी कारवायांचा भेसूर चेहरा आपण पाहिला. अमेरिकेत वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या ९/११ च्या महाभयंकर हल्ल्यामुळे दहशतवादाचा भस्मासूर कुणालाही गिळंकृत करू शकतो, याची कल्पना जगाला आली. डॅनियल पर्लची हत्या, पेशावर येथे शाळेवरील दहशतवादी हल्यातील चिमुकल्यांचा मृत्यू, 'चार्ली हेब्दो' वरील हल्ला, आयसिसने घडवलेले मृत्युकांड यामधून दहशतवाद्यांचे वाढत चाललेले क्रौर्य आणि बदलती कार्यपद्धती याविषयी जग सजग झाले. पश्चिमी देश सुरुवातीला दहशतवादी हल्ल्यांकडे विभागीय समस्या म्हणून पाहत होते.*

*फ्रान्स, जर्मनी, ब्रिटनमध्ये झालेल्या भीषण हल्ल्यांनंतर 'इस्लामफोबिया' म्हणत त्यांनी दहशतावादाविरुद्ध रणशिंग फुंकले. ट्विन टॉवर्सवरील हल्ल्यांनंतर तत्कालीन अमेरिकन अध्यक्ष जॉर्ज बुश यांनीही 'क्रुसेड' म्हणत धर्मयुद्ध ललकारले होते. पहलगाममधील हल्लाही धर्माची विचारणा करूनच झाला होता. त्यामागे भारतात धार्मिक द्वेष वाढवण्याची सुनियोजित रणनीती होती. प्रत्यक्ष युद्धात भारताला पराभूत करणे शक्य नाही, हे लक्षात आल्यानंतर पाकिस्तानने दहशतवादी कारवायांस सुरुवात केली. याला 'प्रॉक्सी वॉर' किंवा 'छद्म युद्ध' म्हणतात. वास्तविक, भारतात गेल्या ३०-३५ वर्षांत झालेले दहशतवादी हल्ले, त्यामध्ये पकडलेले संशयित, त्यांचे टार्गेट, दहशतवाद्यांना मदत करणारे स्लीपर सेल्स या सर्वांमध्ये विशिष्ट धर्माच्या लोकांचा सहभाग असल्याचे दिसत असूनही अमेरिकेप्रमाणे भारताने 'धर्मयुद्ध' म्हणून या प्रश्नाचा बभ-ा केला नाही. भारत सुरुवातीपासूनच दहशतवाद ही जागतिक समस्या आहे आणि तिचा बिमोड सामूहिकरीत्या करणे आवश्यक आहे, ही भूमिका मांडत आला आहे, तरीही १९३ देश सदस्य असणार्या संयुक्त राष्ट्राला अद्याप दहशतवादाची परिपूर्ण व्याख्या करता आलेली नाही. कारण, प्रत्येक देश स्वहितसंबंधांतून दहशतवादाकडे पाहतो. यामुळेच राष्ट्रांचा संरक्षण व्यवस्थांवरचा खर्च अब्जावधी डॉलर्सनी वाढूनही दहशतवादाचे आव्हान संपलेले नाही. पहलगाम हल्ल्यानंतर पाकला धडा शिकवण्यासाठी राबवलेले 'ऑपरेशन सिंदूर' ही दहशतवादविरोधातील भारताची पहिली कारवाई नव्हती. यापूर्वी उरी हल्ल्यानंतरचा सर्जिकल स्ट्राईक, पुलवामा हल्ल्यानंतरचा एअरस्ट्राईक आणि अन्य अनेक कारवायांमधून भारताच्या जाँबाज जवानांनी पाकड्यांना धूळ चारली आहे; पण त्या कारवाया आणि 'ऑपरेशन सिंदूर' यांमध्ये गुणात्मक फरक होता. भारत जगातील अत्यंत जबाबदार अण्वस्त्रधारी देश आहे, तरीही पाकिस्तानी लष्करी अधिकारी आणि राजकीय नेत्यांच्या अणुयुद्धासंदर्भातील इशार्यांचा भारत गांभीर्याने विचार करत आला. पहलगाम हल्ल्यानंतरही अशा धमक्या पाककडून दिल्या गेल्या; पण त्यांना भीक न घालता भारताने हे मिशन राबवले आणि केवळ पाकव्याप्त काश्मीरच नव्हे, तर कराची, इस्लामाबादसह पाकिस्तानातील एकही शहर भारतापासून सुरक्षित नाही, याची झलक दाखवून दिली. या ऑपरेशनने भारताला 'न्यूक्लियरफोबिया'तून बाहेर काढले.*

*युद्ध संघर्षातील सर्व तपशील सार्वजनिक पटलावर येत नाहीत; पण तपशिलांपलीकडे पाकिस्तानचे भारतीय सैन्याने नुकसान केले आहे, हे निश्चित! वर्षभरात थंडावलेल्या पाकिस्तानी कारवाया 'ऑपरेशन सिंदूर'ने काय साधले, याचे उत्तर देत आहेत. हल्ल्यानंतर काही महिन्यांत पर्यटक संख्येत मोठी घट झाली. भीती आणि असुरक्षिततेच्या भावनेमुळे अनेक पर्यटकांनी दौरे रद्द केले; मात्र स्थानिक प्रशासन आणि सुरक्षा दलांनी परिस्थिती हाताळण्यासाठी ठोस पावले उचलली. आज पहलगामच्या बाजारपेठा पुन्हा गजबजल्या आहेत. हल्ल्याची जबाबदारी घेतलेल्या 'द रेझिस्टन्स फ्रंट' या लष्करे तैयबाशी संलग्न दहशतवादी संघटनेचे तीन प्रमुख पाकिस्तानी दहशतवादी जुलै २०२५ मध्ये सुरक्षा दलांनी राबवलेल्या 'ऑपरेशन महादेव'अंतर्गत चकमकीत मारले गेले. 'ऑपरेशन सिंदूर'मध्येही १०० हून अधिक दहशतवाद्यांना भारतीय लष्कराने कंठस्नान घातले. लष्कराने दाखवलेले शौर्य अजोड आहे; पण आपण जीवाची बाजी लावणार्या सैनिकांच्या पाठीशी ठामपणाने उभे राहतो का, याचा विचार वर्षपूर्तीनंतर होणे गरजेचे आहे. पहलगाम प्रकरणात परवेझ अहमद आणि बशीर अहमद जोथाड या स्थानिकांनी अवघ्या ३००० रुपयांसाठी दहशतवाद्यांना आश्रय दिला होता.*

*दोघांनाही अटक झाली आणि स्थानिक जनतेने त्यांचा निषेध केला; पण राजकीय पक्षांचे काय? 'ऑपरेशन महादेव'सारख्या महत्त्वाकांक्षी मिशनबाबत विरोधी पक्षांचे नेते संशयाचे वातावरण तयार करत असतील, तर दहशतवादाचा मुकाबला करायचा कसा? दहशतवाद्यांना आश्रय देणार्यांमध्ये आणि लष्कराचे मनोधैर्य खच्ची करणार्यांमध्ये फरक काय? या प्रश्नांचा राष्ट्रहिताच्या अनुषंगाने गांभीर्याने विचार केल्याखेरीज या युद्धातील यशाला अर्थपूर्णता नाही. हीच बाब जगाची आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर सरकारने विविध देशांत शिष्टमंडळ पाठवले. यामध्ये भारताच्या भूमिकेला कुणी विरोध केला नसला, तरी समर्थन देऊन पाकविरोधात कारवाईसाठीही पुढाकार घेतला नाही. उलटपक्षी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भिकेकंगाल पाकला भरीव आर्थिक मदत दिली. ट्रम्प अध्यक्ष बनल्यापासून तर अमेरिकेचे पाकप्रेम उफाळून आले आहे. दहशतवादाविरुद्धच्या जागतिक लढाईसाठीच्या सीटीसी समितीचे उपाध्यक्षपद पाकिस्तानला देण्यापर्यंत या प्रेमाचे भरते आले. इराणविरुद्ध संघर्षातही ट्रम्प यांची खुशामत केल्यानेच पाकिस्तान मध्यस्थ बनला. हा भारताला डिवचण्याचा आणि सौदेबाजीचा भाग असला, तरी ९/११ च्या हल्ल्याचा मास्टरमाईंड ओसामा बिन लादेन अबोटाबादेत सापडला होता, हे अमेरिकेने विसरू नये. चीनही भारताविरुद्धचे कार्ड म्हणून पाकचे चोचले पुरवतो. अशा दुतोंडी आणि आपमतलबी भूमिकांनी दहशतवादाविरुद्धची लढाई जिंकता येणार नाही. तहरीक ए तालिबान पाकिस्तान आणि अफगाणिस्तानातील तालिबान्यांच्या भेदक हल्ल्यांच्या रूपाने पाकिस्तान आपल्या कर्मांची फळे भोगत आहे. येणार्या काळात हा देश फुटणार, हे अटळ आहे; पण उर्वरित जगाचे काय? दहशतवादमुक्त जग ही उद्दिष्टपूर्ती कधी होणार?*

# प्रवासी निवाऱ्याची लोकवर्गणीतून दुरुस्ती

## युवकांचे प्रेरणादायी कार्य:लोकप्रतिनिधींना लाजवेल असे केले गावातील युवकांनी काम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोकसंख्या आणि भौगोलिक रचनेच्या दृष्टीने महत्त्व असलेल्या माहुली चोर येथील प्रवासी निवाऱ्याची दुरुस्ती लोकवर्गणीतून करण्यात आली. त्यासाठी गावातील तरुणांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या या कृतीमुळे लोकप्रतिनिधींना लाजवेल, असे काम झाल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे.




सदर गाव हे अमरावती-यवतमाळ मार्गावर असल्यामुळे परिसरातील अनेक गावांतील नागरिक येथूनच प्रवास करतात. मात्र, मागील काही वर्षांपासून येथील प्रवासी निवाऱ्याची दुरवस्था झाली होती. बसण्यासाठीचा ओटा पूर्णपणे उखडला होता. छतावरील टीनपत्रेही तुटली होती. त्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. याकडे या विभागाच्या लोकप्रतिनिधींनी कधीही लक्ष दिले नाही. त्यांना हे काम करावेसेच वाटले नाही. अशा स्थितीत गावातील काही युवकांनी एकत्र येऊन या गंभीर समस्येची दखल घेत तो निवारा दुरुस्त केला.

गावातील सामाजिक कार्यकर्त्यांनीही त्यासाठी मदत केली. अंकुश कोल्हे, अंकेश खांडेकर, राजू पवार, अमोल इंगोले, अक्षय पवार, रोशन मेश्राम, आदित्य चोरे, रोशन गाडेकर, नरेंद्र जाधव, संकेत चापले, स्वप्निल चोरे व इतर सहकाऱ्यांनी शिवजयंती ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती या कालावधीत विविध सामाजिक उपक्रम राबवत लोकवर्गणी गोळा केली आणि या लोकवर्गणीतून निवाऱ्याची दुरुस्ती केली. अशाप्रकारे लोकसहभागातून हा प्रवासी निवारा पुन्हा उभा ठाकला. लोकवर्गणीतून काय केले ? लोकवर्गणीतून या ठिकाणी प्रवाशांना बसण्या साठी नव्याने ओटा बांधण्यात आला. छतावरील टीनपत्रेही बदलण्यात आली. त्यामुळे आता प्रवाशांना उन, पावसापासून संरक्षण मिळत आहे. आरामदायी बसण्याची सोयही उपलब्ध झाली आहे. दरम्यान गावातील तरुणांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत उचललेले हे पाऊल इतरांसाठीही प्रेरणादायी ठरले आहे.


# ६८ ग्रामपंचायतीमध्ये निवडणुकीची रणधुमाळी

## दोन सरपंचांसह ३२ सदस्य बिनविरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती**-जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये शालेल्या जागांसाठी पोटनिवडणुकीच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. सोबतच राजकीय हालचालींनाही वेग आलेला आहे. यामध्ये २ सरपंचांसह ३२ सदस्य अविरोध झाले आहेत. त्यामुळे सरपंच पदाच्या दोन जागांसह सदस्यपदांच्या आठ जागांसाठी २८ एप्रिल रोजी निवडणूक होणार आहे.

६८ जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये एकूण ९७ सदस्य व सरपंच पदांच्या जागा विविध कारणांमुळे रिक्त झाल्या होत्या. या रिक्त जागांसाठी २८ तारखेला मतदान होणार आहे. पूर्वी अर्ज प्रक्रियेदरम्यान अनेक जागांसाठी अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.




विशेष म्हणजे ५७ सदस्य पदांसाठी एकही अर्ज दाखल झाला नाही, तर दोन सरपंच पदांसाठीही उमेदवार पुढे आले नाहीत. त्यामुळे या जागांसाठी पुन्हा निवडणूक घ्यावी लागणार आहे. दरम्यान, छाननीनंतर काही ठिकाणी बिनविरोध निवडही झाली आहे.जिल्ह्यात ३२ सदस्य बिनविरोध निवडून आले असून, दोन सरपंच पदेही बिनविरोध झाली आहेत. त्यामुळे काही ठिकाणी निवडणुकीची रंगत कमी झाली असली तरी उर्वरित ठिकाणी चुरशीची लढत अपेक्षित आहे. आता दहा ग्रामपंचायतींमध्ये आठ सदस्य पदांसाठी, तर पाच ग्रामपंचायतींमध्ये पाच सरपंच पदांसाठी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. या निवडणुकांकडे स्थानिक राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे म्हणून पाहिले जात असून, विविध पक्ष आणि स्थानिक गटांनी आपापली ताकद लावण्यास सुरुवात केली आहे. एकूणच, अविरोध निवडींची संख्या लक्षणीय असली तरी उर्वरित जागांवरील निवडणुका स्थानिक राजकीय समीकरणे बदलवू शकतात, असे चित्र सध्या दिसत आहे.

## गुरुदेवनगर-मोझरी परिसरात

# पुन्हा आगीचा कहर

### दोन तासांच्या झुंजीनंतर नियंत्रण !



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती**-तिवसा तालुक्यातील गुरुकुंज मोझरी येथील दासटेकडी परिसरात मंगळवारी (दि. २१ एप्रिल) रात्री सुमारे ९.१५ वाजताच्या सुमारास पुन्हा एकदा भीषण आग लागून परिसरात मोठी खळबळ उडाली. गुरुदेवनगरजवळील पाणीपुरवठा टाकीजवळ अचानक पेटलेल्या आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण करत परिसरातील झाडे, झुडपे आणि वनक्षेत्र भक्षस्थानी घेतले.

घटनेची माहिती मिळताच तिवस्याचे ठाणेदार गोपाल उपाध्याययांनी तत्काळ पथकासह घटनास्थळी धाव घेतली. यामध्ये हेड कॉन्स्टेबल रवींद्र लांजेवार, कर्मचारी चव्हाण व वानखडे यांचा समावेश होता. नगरपंचायतीच्या अग्निशमन दलानेही तातडीने घटनास्थळी पोहोचत आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.दरम्यान, आग वेगाने पसरत असल्याने ग्रामस्थ आणि वाहनचालकांनीही पुढाकार घेत अग्निशमन दलाला मदत केली. मात्र, वाऱ्याच्या वेगामुळे आग अधिक भडकत गेल्याने परिस्थिती काही काळ नियंत्रणाबाहेर गेली होती. अखेर अग्निशमन सहाय्याने दलाच्या सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आणण्यात यश आले.या आगीत मोठ्या प्रमाणात वृक्षसंपत्तीचे नुकसान झाले आहे. आग नेमकी कशामुळे लागली, याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. विशेष म्हणजे, तिवसा तालुक्यातील एका दिवसातील ही दुसरी आग लागण्याची घटना आहे. सायंकाळीही गुरुदेवनगर परिसरात लागलेल्या आगीमुळे अग्निशमन दलाची पुन्हा एकदा तारांबळ उडाली. प्रशासनाने या घटनांची गंभीर दखल घेत आगीमागील कारणांचा सखोल तपास करावा, अशी मागणी गुरुदेव भक्तांकडून होत आहे.-

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीत पदवीदान सोहळा

## महाविद्यालयातील २५ विद्यार्थी गुणवत्तायादीत झळकले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती,**

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती येथे नुकताच सर्व शाखेतील बीई अंतिम वर्ष २०२५ तसेच एमबीए व एमसीए पहिली ऑटोनॉमस बॅचचा पदवी प्रदान समारंभ उत्साहात झाला. कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शाखांतील बीई अंतिम वर्ष २०२५ च्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेल्या व एमबीए आणि एमसीए ऑटोनॉमस बॅचच्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. याच सोबत



विद्यापीठातील गुणवत्तायादीतील प्राविण्य सूचित नाव असलेल्या एकूण २५ विद्यार्थ्यांचा सत्कार डॉ. नितीन कोळी यांच्या हस्ते करण्यात आला. यावर्षी पी. आर. पोटे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या अभियांत्रिकी, एमसीए आणि एमबीएच्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता सूचित स्थान प्राप्त केले. कार्यक्रमाची सुरवात सरस्वती व संत गाडगे महाराज प्रतिमेचे पूजन, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताने झाली. यानंतर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे संचालक तथा परीक्षा नियंत्रक डॉ. नितीन कोळी यांनी विद्यार्थ्यांना भारतासारख्या प्रगतशील राष्ट्रात भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि देशांतर्गत ऊर्जा निर्मितीचे महत्त्व विशद केले. प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांनी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना नैतिकतेची शपथ दिली. तसेच संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके यांनी गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. मो. झुहेर यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. संचालन डॉ. गौरी देशपांडे यांनी केले. आयोजन डॉ. सचिन सराफ, डॉ. सोमदत्त तोंडरे यांनी केले.

# क्यूआर कोड स्कॅन बंद; शहर 'कचराकुंडी': स्वच्छता कंत्राटदाराकडून नियमाची पायमल्ली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

शहरातील घराघरांमध्ये दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे नियमानुसार स्वच्छता कंत्राटदाराद्वारे चालवल्या जाणाऱ्या घंटागाड्या दररोज संकलन करतात की नाही, यावर वचक ठेवण्यासाठी शहरातील प्रत्येक घर, वसाहतींमध्ये क्युआर कोड लावण्यात आले आहेत. परंतु, कमी मनुष्यबळ, मर्यादित घंटागाड्या आणि अपुऱ्या साहित्याची बाब दडवण्यासाठी स्वच्छता कंत्राटदार नियमांची पायमल्ली करीत क्युआर कोड स्कॅनच करीत नाहीत. कारण, ते आठवड्यातून केवळ एक किंवा दोन दिवस, काही रहिवासी भागांमध्ये तर ८ ते १० दिवसांतून एकदाच घंटागाडीद्वारे कचरा संकलित करतात. आपले पितळ उघडे पडू नये म्हणून घंटागाड्या क्युआर कोड स्कॅन करीत नसून हे नियमाचे उल्लंघन असले तरी ते सर्रास केले जात आहे.

यासाठी मनपा सभागृहाने स्थापन केलेल्या स्वच्छता अभ्यास गटाने प्रति घटना प्रति दिवस १ हजार रु. दंडाची शिफारस केली आहे. मात्र, मनपा प्रशासन अजुनही, उर्वरित, पान.४ स्वच्छता कंत्राटदाराकडे प्रत्येक प्रभागात सरासरी ५४ स्वच्छता कामगार हवेत. तसेच कराराचा भाग अ व भाग ब मिळून एकूण १२५१ कामगार तसेच ५१८ वाहने असणेही अनिवार्य आहे.परंतु, स्वच्छता अभ्यास गटाला यात उणीव व अनियमितता आढळली आहे. त्यामुळे त्यांनी तत्काळ मनुष्यबळासह वाहने व साहित्याची उणीव भरून काढण्यासोबतच धुवारणी व फवारणीही करण्याची मागणी केली आहे. कागदावर बळ : प्रत्यक्षात बोंबाबोंब! कंत्राटाच्या अटींनुसार, प्रत्येक प्रभागात ५४ स्वच्छता कामगार असणे अनिवार्य आहे. करारातील भाग 'अ' आणि 'ब' मिळून एकूण १२५१ कामगार आणि ५१८ वाहने असणे गरजेचे असताना, साहित्याचा मोठा तुटवडा आहे. मनपाची 'अभ्यासगिरी': कारवाई कधी? स्वच्छता कंत्राटदाराच्या कामावर बारकाईने लक्ष असल्याचे प्रशासन सांगत असले, तरी स्थिती 'जैसे थे' आहे. अभ्यास गटाने अहवाल देऊनही प्रशासन तो 'बघत' असल्याचे सांगून कारवाई टाळत आहे. कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. डॉ. अजय जाधव, स्वच्छता अधिकारी, मनपा. 'डिजिटल' खेळ : क्यूआर स्कॅन होत नाही स्वच्छता कंत्राटदाराकडून नियमांची सर्रास पायमल्ली केली जात आहे. दररोज कचरा संकलन होत नसल्याने, आपली 'पोलखोल' होऊ नये म्हणून घंटागाडी कर्मचारी मुद्दाम क्यूआर कोड स्कॅनिंग टाळत आहेत. दणका : कंत्राटदारावर दंडाची तलवार मनपाने स्थापन केलेल्या १९ सदस्यीय सर्वपक्षीय स्वच्छता अभ्यास गटाने कंत्राटदाराच्या कामावर ताशेरे ओढले आहेत. शहराचे कंत्राट घाईत आणि पूर्वनियोजन न करता देण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.



# NEET पूर्वतयारीसाठी अमरावतीत मॉक टेस्ट

## विद्यार्थ्यांना मिळणार प्रत्यक्ष परीक्षेचा अनुभव

### ‘वे एज्युकेशन इनिवेटिव्ह’चा उपक्रम; २५ व २७ एप्रिलला आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती : –** राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (छएएढ) जवळ येत असताना विद्यार्थ्यांमध्ये वाढणारा ताण आणि दडपण लक्षात घेऊन ‘वे एज्युकेशन इनिवेटिव्ह’च्या वतीने अमरावतीत विशेष मॉक टेस्टचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेचा अनुभव मिळावा, त्यांच्या मनातील भीती कमी व्हावी आणि वेळेचे योग्य नियोजन करता यावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.ही मॉक टेस्ट दोन टप्प्यांत आयोजित करण्यात आली आहे. पहिली परीक्षा २५ एप्रिल रोजी देवरणकर नगर येथील श्री समर्थ हायस्कूलमध्ये, तर दुसरी परीक्षा २७ एप्रिल रोजी श्री ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयात पार पडणार आहे. या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह पालकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून



शेकडो विद्यार्थी सहभागी होण्याची शक्यता आयोजकांनी व्यक्त केली आहे.या मॉक टेस्टमध्ये छएएढ परीक्षेप्रमाणेच वातावरण निर्माण करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रावर शिस्त, वेळापत्रक आणि नियमांचे काटेकोर पालन केले जाणार असून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेची सवय व्हावी यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे परीक्षेच्या दिवशी येणारी भीती आणि गोंधळ कमी होण्यास मदत होणार आहे.स्पर्धा परीक्षांच्या तयारीमध्ये मॉक टेस्टला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. नियमित मॉक टेस्ट दिल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वतःची तयारी तपासता येते, चुका ओळखून त्यावर सुधारणा करता येते आणि प्रश्न सोडवण्याचा वेग व अचूकता वाढवता येते. तसेच वेळेचे नियोजन करण्याची सवय लागल्याने परीक्षेत गुण वाढवण्यास मदत होते.‘वे एज्युकेशन इनिवेटिव्ह’चे संचालक रविकिरण पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांची छएएढ परीक्षेबाबतची भीती कमी करणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन देणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. ही मॉक टेस्ट केवळ परीक्षा नसून विद्यार्थ्यांच्या मानसिक तयारीला बळ देणारा अनुभव आहे. अनुभवी शिक्षक व व्यवस्थापकांच्या मार्गदर्शना खाली ही परीक्षा घेतली जाणार असून संपूर्ण नियोजन वास्तवदर्शी अनुभव देण्यासाठी करण्यात आले आहे.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावरील संभाव्य अडचणींची पूर्वतयारी करता येणार आहे. वेळेचे व्यवस्थापन कसे करावे, कोणत्या प्रश्नांवर अधिक वेळ द्यावा आणि पेपर कसा हाताळावा, याचेही मार्गदर्शन या माध्यमातून मिळणार आहे. परिणामी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून ते अधिक तयारीनिशी छएएढ परीक्षेला सामोरे जाऊ शकतील. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले असून अधिक माहितीसाठी ८५३०४४७२२२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे सांगितले आहे.

#### वेळ व्यवस्थापनावर भर

या मॉक टेस्टमुळे विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन कसे करावे, कोणत्या प्रश्नांवर अधिक वेळ द्यावा हे समजण्यास मदत होणार आहे. त्यामुळे ते अधिक आत्मविश्वासाने परीक्षा देऊ शकतील.बॉक्स...

#### आत्मविश्वास वाढीस मदत

छएएढ परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी ही मॉक टेस्ट उपयुक्त ठरणार असून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

# इर्विन शवागारात शीतसाखळी कोलमडली

## फ्रीजर बंद, दरवाजा तुटलेला

### मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे देखभाल ठप्प; नातेवाइकांची मोठी गैरसोय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती**

अमरावतीतील इर्विन जिल्हा रुग्णालयाच्या शवागारात गंभीर त्रुटी उघड झाल्या असून शीतसाखळी व्यवस्थाच कोलमडल्याचे चित्र समोर आले आहे. दररोज नैसर्गिक मृत्यू, अपघात आणि उपचारादरम्यान मृत्यू झालेल्या रुग्णांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी येथे आणले जातात. अशा परिस्थितीत शवागारातील शीतपेट्या आणि फ्रीजर सुरळीत चालू राहणे अत्यावश्यक असते. मात्र प्रत्यक्षात केवळ एकच शीतपेटी कार्यरत असून दुसरी बंद पडली आहे. याशिवाय फ्रीजर रूमचा दरवाजाही तुटलेल्या अवस्थेत असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.शीतपेट्या बंद पडण्यामागे तांत्रिक बिघाड, जुनी





यंत्रणा, वेळेवर देखभाल न होणे आणि शीतकरणासाठी लागणाऱ्या गॅसचा अभाव ही प्रमुख कारणे सांगितली जात आहेत. दुरुस्तीचे प्रस्ताव वारंवार पाठवले जात असले तरी प्रत्यक्ष कामाला विलंब होत असल्याने समस्या कायमच आहे. परिणामी शवागारातील तापमान आवश्यक पातळीवर राखले जात नसून मृतदेहांमधून दुर्गंधी येऊ लागल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.यातच मनुष्यबळाची कमतरता परिस्थिती अधिक बिकट करत आहे. तंत्रज्ञ, परिचर आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला आहे. त्यामुळे साफसफाई, देखभाल, मृतदेहांची योग्य हाताळणी आणि नोंद प्रक्रियेतही त्रुटी निर्माण होत आहेत.

शवागारात दोन फ्रीजर असून प्रत्येकात दोन मृतदेह ठेवण्याची क्षमता आहे, तर स्वतंत्र फ्रीजर रूममध्ये दहा ते बारा मृतदेह ठेवता येतात. मात्र सध्याच्या बिघाडामुळे नातेवाइकांना मृतदेह ताब्यात घेण्यासाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. याप्रकरणी रुग्णालय प्रशासनाने दुरुस्तीसाठी संबंधित यंत्रणेला पत्र पाठवले असले तरी तातडीने उपाययोजना होण्याची गरज व्यक्त होत आहे.

# मिनी महापौर निवडणूक २९ ला

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२३अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या पाच झोन सभापती म्हणजेच मिनी महापौर पदाची निवडणूक २९ एप्रिल रोजी निश्चित करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून तसे पत्र महानगरपालिकेला प्राप्त झालेले असून निवडणूक निर्णय अधिकारी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवडणूक घेतली जाईल.स्व. सुदाम काका देशमुख सभागृहात २९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता हात उंच करून मतदान घेतले जाणार आहे. पाच झोन सभापतींकरिता ही निवडणूक असून प्रत्येक झोनला निवडणूक प्रक्रियेकरिता अर्धा तासाचा वेळ दिला जाणार आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज बघतील. महापालिकेमध्ये महायुतीची सत्ता असून भाजपचा महापौर व युवा स्वाभिमानचा उपमहापौर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे स्थायी समिती सभापती हे पद देण्यात आले आहे. त्याच पद्धतीने पाच झोन सभापतींपैकी दोन झोन सभापतीपद हे भाजपकडे,एक युवा स्वाभिमान व एक राष्ट्रवादी काँग्रेसकडे जाण्याची शक्यता आहे. झोन क्रमांक पाचमध्ये एमआयएम व काँग्रेस यांच्यामध्ये चुरस होईल. या झोनमध्ये एमआयएमचे नऊ, काँग्रेसचे पाच, युवा



स्वाभिमान तीन व वंचित, राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाचा प्रत्येकी एक एक सदस्य आहे. त्यामुळे या झोन क्रमांक पाचमध्ये एमआयएम पक्षाकडे झोन सभापती पद जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.


# विद्यापीठात लवकरच ‘ज्येष्ठ नागरिक कक्ष’

## कुलगुरू मिलिंद बारहाते यांची ज्येष्ठ मंडळाला ग्वाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात शासन धोरणानुसार ‘ज्येष्ठ नागरिक कक्ष’ लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची ग्वाही कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी दिली. संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी कुलगुरूंची भेट घेऊन यासंदर्भात चर्चा केली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, श्रीकांत पाटील उपस्थित होते. चर्चेपूर्वी शिष्टमंडळाने कुलगुरू यांच्यासह पदाधिकाऱ्यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. शिष्टमंडळात प्रा. सुभाष गवई, अध्यक्ष पुरुषोत्तम गावंडे,




समन्वय समितीचे अध्यक्ष दामोदर पवार तसेच प्राचार्य खांबरे यांचा समावेश होता. यावेळी प्रा. गवई यांनी दोन वर्षांपूर्वी प्रस्ताव देऊनही कक्ष सुरू न झाल्याची खंत व्यक्त केली. पुरुषोत्तम गावंडे यांनी इतर विद्यापीठांमध्ये अशा कक्षांची अंमलबजावणी झाल्याचे सांगत, संत गाडगेबाबा यांच्या नावाशी सुसंगत उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त केली. दामोदर पवार यांनी शासनाच्या ज्येष्ठ नागरिक धोरण २०१३ तसेच ९ जुलै २०१८ च्या शासननिर्णयानुसार प्रत्येक विद्यापीठात असा कक्ष बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले. प्राचार्य खांबरे यांनी विद्यापीठ कायद्याच्या कलम ४५ नुसार प्रौढ व निरंतर शिक्षण मंडळावर ज्येष्ठ नागरिकांच्या आजीवन शिक्षणाची जबाबदारी असल्याचे निदर्शनास आणले. यावर कुलगुरू डॉ. बारहाते यांनी कक्ष स्थापनेबाबत सकारात्मक भूमिका दर्शवून आवश्यक तांत्रिक बाबी पूर्ण करून लवकरच कक्ष कार्यान्वित करण्यात येईल, अशी शाश्वती दिली.

# विजेच्या खांबाला बांधून मारहाण करणाऱ्यां विरुद्धही गुन्हा दाखल


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती –** चोरीच्या उद्देशाने घराच्या परिसरात आल्याचा संशय घेऊन विजेच्या खांबाला बांधून मारहाण करणाऱ्यांविरुद्ध कुऱ्हा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे ज्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तो गटही बुधवारी (ता. २२) पोलिस अधीक्षक कार्यालयावर धडकला. अतुल दिलीप पवार (वय ३०, रा. कारला, ता. चांदूररेल्वे) या जखमीच्या तक्रारीवरून कुऱ्हा ठाण्यात मंगळवारी (ता. २१) संशयित शैलेंद्र साहेबराव जाधव, नरेंद्र जाधव, रत्नदीप नारायण गिरासे, धीरज भरत जाधव, संदीप अंबादास गिरासेसह अन्य चौघे, अशा एकूण नऊ जणांविरुद्ध गैरकायद्याची मंडळी जमविली व शिवीगाळ करून मारहाण केली, असा संशयितांवर आरोप आहे. अतुल दिलीप पवार यांना चोर समजून खांबाला बांधून मारहाण करणाऱ्यांविरुद्धही कायदेशीर गुन्हा दाखल व्हावा, या मागणीसाठी काही वकिलांसह शेकडो नागरिक यांनी सोमवारी (ता. २०) पोलिस अधीक्षक कार्यालयावर धाव घेतली होती. त्यानंतरच कुऱ्हा ठाण्यात हा दुसरा गुन्हा दाखल झाला होता. अतुल पवार हे ओळखीचे घर समजून १७ एप्रिल रोजी एका घरात शिरले होते. ते चोरीच्या उद्देशाने आल्याचा आरोप करून त्यांना ग्रामस्थांनी पकडून मारहाण केली, असा त्यांचा आरोप आहे.

# आमदारांच्या उपस्थितीत भाजपची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३चांदूरबाजार,** भारतीय जनता पार्टीच्या वतीने चांदूरबाजार तालुक्यात तालुका आढावा बैठक पार पडली. या बैठकीत तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान सर्कल प्रमुख, बूथ प्रमुख तसेच शक्ती केंद्रप्रमुख यांच्या माध्यमातून मतदारसंघात प्रभावीपणे काम कसे करावे, यावर विशेष भर देण्यात आला. भारतीय जनता पार्टी प्रत्येक घरापर्यंत पोहोचावी, जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे तत्काळ निराकरण व्हावे तसेच पक्षाच्या विविध उपक्रमांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी, हा बैठकीचा मुख्य उद्देश होता. यावेळी केंद्र व राज्य शासनाच्या विविध शासकीय तसेच निमशासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखालील राज्य शासनाच्या योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे यांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. आमदार तायडे हे जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने काम करीत असून, पूर्वी न झालेली अनेक कामे आता प्रभावीपणे होत आहेत. जनतेची सेवा करण्याचा त्यांचा ध्यास असून त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढत आहे, असे तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे म्हणाले. बैठकीला आमदार प्रवीण तायडे, तालुका अध्यक्ष (ग्रामीण) रमेश तायवाडे, माजी तालुकाध्यक्ष किरण शिनकर तसेच तालुक्यातील विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# उन्हाच्या कडाक्यात पिकांना ओलित

## शेतकऱ्यांचा जीव धोक्यात, सकाळी ५ ते ११ वाजेपर्यंत वीजपुरवठ्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ मोर्शी–** सध्या शेतीसाठी वीजपुरवठा सकाळी ९.१५ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत होत असल्यामुळे शेतकऱ्यांना भर उन्हातच शेतात जावे लागत आहे. दुपारी १२ ते ४ यावेळेत उन्हाचा सर्वाधिक तडाखा असताना ओलित करणे म्हणजे अक्षरशः जिवाशी खेळ करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. कांदा पिकाला नियमित व नियंत्रित पाण्याची आवश्यकता असते. पाणी कमी-जास्त झाल्यास उत्पादनात घट येण्याचा धोका असतो. तीळ आणि भुईमूग ही पिकेही अत्यंत संवेदनशील असून योग्यवेळी ओलित न झाल्यास झाडांची वाढ खुंटते आणि उत्पादनावर थेट परिणाम होतो. त्यामुळे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांना उन्हाचा विचार न करता शेतात राबावे लागत आहे. यादरम्यान उष्माघात, अंगदुखी, डोकेदुखी, चक्कर येणे, अशक्तपणा यांसारख्या आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांना काम करताना तब्येत बिघडल्याच्या घटनाही समोर येत आहेत. शेती ही वेळेवर अवलंबून असलेली प्रक्रिया असल्यामुळे शेतकऱ्यांकडे पर्याय नसतो. पिके वाचविण्यासाठी त्यांना स्वतःच्या आरोग्याचा धोका पत्करावा लागत आहे.

यामुळे नेरपिंगळाई व आसपासच्या गावांमधील शेतकऱ्यांनी महावितरण कंपनीकडे सकाळी पाच ते ११ वाजेपर्यंत वीजपुरवठा करण्याची जोरदार मागणी केली आहे. पहाटेच्या थंड वातावरणात ओलित केल्यास शेतकऱ्यांना उन्हाचा त्रास कमी होईल, कामाची कार्यक्षमता वाढेल आणि पिकांनाही योग्यप्रमाणात पाणी देता येईल, असे शेतकरी सांगत आहेत. याशिवाय सकाळच्या वेळेत ओलित केल्यास पाण्याचे बाष्पीभवनही कमी होते, त्यामुळे पाण्याची बचत होऊन शेती अधिक परिणामकारक पद्धतीने करता येते. सध्याच्या दुपारच्या वेळेत दिल्या जाणाऱ्या विजेमुळे पाण्याचा अपव्ययही वाढत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांच्या आरोग्याचा, पिकांच्या उत्पादनाचा आणि पाण्याच्या योग्य वापराचा विचार करता शासन व महावितरणने तातडीने हस्तक्षेप करून विजेचे वेळापत्रक सकाळी पाच ते ११ या वेळेत करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी आता तीव्र झाली आहे.परिसरात तापमान ४३ अंशांच्या पुढे गेले आहे. या भीषण उष्णतेच्या लाटेतही शेतकऱ्यांची शेतीची कामे मात्र सुरूच आहेत.




सध्या कांदा, तीळ आणि भुईमूग या प्रमुख पिकांचे ओलित (पाणी देणे) मोठ्या प्रमाणावर सुरू असून पिकांच्या वाढीसाठी व उत्पादन टिकवण्यासाठी वेळेवर पाणी देणे अत्यंत गरजेचे बनले आहे. तथापि, उन्हाचा कडाका पाहता सकाळी ५ ते ११ वाजेपर्यंत वीजपुरवठ्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. सकाळी ५ ते ११ वाजेपर्यंत वीजपुरवठा द्यावा, याकरिता शेतकऱ्यांकडून मागणी झालेली आहे. शेतकऱ्यांकडून निवेदन प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठ कार्यालयाला पाठवून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल.
**–दिनेश भागवत,** उपकार्यकारी अभियंता, वीज कंपनी, मोर्शी.

# दर्यापूर ब्राह्मणसभेतर्फे भगवान परशुराम जयंती

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.२३दर्यापूर –** ,स्थानिक ब्राह्मण सभेतर्फे भगवान परशुराम जयंती रविवारी (ता. १९) साजरी करण्यात आली. दर्यापूर-बनोसा स्थित माहेश्वरी भवन येथे यानिमित्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शेकडोच्या संख्येने उपस्थित ब्रह्मवृंदांनी भगवान परशुरामाचे पूजन, आरती, प्रसाद, सुंदरकांड व महाप्रसादाचा लाभ घेतला. प्रारंभी दर्यापूर येथील कार्यरत उपविभागीय पोलिस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, पूजन, हारार्पण करून आरती करण्यात आली. सभेचे अध्यक्ष भरत शुक्ला यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे सतीश कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर श्री. शुक्ला, नवनिर्वाचित नगरसेविका विजयाताई शुक्ला यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. श्याम पांडे यांच्या समूहाद्वारे सुंदरकांड सादर करण्यात आले. कार्यक्रमाकरिता काँग्रेस नेते सुधाकर भारसाकळे, काँग्रेसचे नगरसेवक



तसेच भाजपचे बाळासाहेब हिंगणीकर, बाबाराव बरवट यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक व महेश्वरी समाज, जैन समाज, गुजराथी समाज, अग्रवाल समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजनामध्ये ब्राम्हणसभेचे हेमंत पाठक, शशांक देशपांडे, धनंजय जोशी, बंडू शर्मा, प्रमोद जोशी, दीपक उफाळे, हर्षल तोत्रे, महेश शर्मा, प्रभाकर जोशी, वर्षा उफाळे, अनिल तिवारी, जय शुक्ला तसेच कार्यकारिणी सदस्यांतर्फे सहयोग देण्यात येऊन कार्यक्रम यशस्वी करण्यात आले.

# तळेगाव ठाकूर येथे कन्या शाळेची कला प्रदर्शनी उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२३ तळेगाव ठाकूर** जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळेत आयोजित कला प्रदर्शनी उत्साहात पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास कुबडे होते, तर उपाध्यक्ष छाया भोजने यांच्या हस्ते प्रदर्शनीचे उद्घाटन झाले.प्रदर्शनीत विद्यार्थिनींनी पर्यावरणपूरक वस्तू, नैसर्गिक साहित्यावर आधारित कलाकृती, कार्यानुभवातून तयार केलेल्या कल्पक निर्मिती व समाजोपयोगी साहित्य सादर केले. विद्यार्थिनींच्या सर्जनशीलतेचे प्रभावी दर्शन यामधून घडले. उपस्थित मान्यवरांनी कलाकृतींची पाहणी करून विद्यार्थिनींचे कौतुक केले.यावेळी विलास कुबडे यांनी विद्यार्थिनींना कला, कौशल्य आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंदांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# पनीर खरेदी करताना खबरदारी घ्या

## शहरात विकल्या जात आहे भेसळ युक्त पनीर

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–** काही उपाहारगृहे, खाद्यगृहे आदी आस्थापनांत पनीरच्या नावाखाली चीज नालॉग प्रकारातील पदार्थ दिला जाऊ शकतो. पनीर दुधाचे आहे का ते तपासणे आवश्यक आहे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. पनीर हा आहाराचा एक महत्त्वाचा घटक आहे. पनीर केवळ चविष्ट नसून पोषणमूल्यांनी समृद्ध असल्यामुळे त्याचे आहारात विशेष स्थान आहे. पनीरमध्ये प्रथिने, कॅल्शियम, जीवनसत्त्वे आणि आवश्यक खनिजे मोठ्या प्रमाणात आढळतात. शाकाहारी लोकांसाठी पनीर हा प्रथिनांचा उत्तम स्रोत मानला जातो. पनीर व चीज ॲनालॉगमध्ये काही मूलभूत फरक आहेत. अन्न सुरक्षा व मानके (अन्नपदार्थ मानके व ॲडिटिव्ह नियम), २०११ मधील नियम २.१.११ नुसार पनीर हे केवळ दुधापासून बनविलेले पदार्थ आहे. परंतु चीज ॲनालॉग हा दूध व्यतिरिक्त इतर खाद्यतेल, स्टार्च, इमल्सिफायर व इतर घटक वापरून बनविलेला पदार्थ असून तो पनीरसारखा दिसतो पण पनीर नाही. एफएसएसएआयच्या मानकांनुसार हा चीज ॲनालॉग या प्रकारात मोडतो.

### अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन





अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे की काही रेस्टॉरंट/केटरर्स/हॉटेल्स/फास्ट फूड विक्रेते या आस्थापनांमध्ये अन्न पदार्थ तयार करताना चीज ॲनालॉगचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून याबाबत सदर आस्थापनांकडून ग्राहकांना पुरेशी माहिती उपलब्ध करून देण्यात येत नसल्यामुळे ग्राहकांची दिशाभूल व फसवणूक होत असल्याचे आढळून आले आहे.

### ग्राहकांनी घ्यावयाची काळजी

पनीर खरेदी करताना पॅकेज उत्पादनावरील लेबल काळजीपूर्वक तपासावे. रेस्टॉरंटमध्ये पनीर खरेदी करताना विक्रेत्याकडे ते शुद्ध दुधापासून बनवलेले आहे का याची खात्री करावी. हॉटेलमधील मेनूकार्डवर पनीर व चीज ॲनालॉग हे दोन स्वतंत्र अन्न पदार्थ आहेत का याची खात्री करावी. ॲनालॉग हा आरोग्यास अपायकारक नसला तरी त्यातील घटक व पोषणमूल्ये पनीरपेक्षा वेगळी असतात. त्यामुळे ग्राहकांनी फसवणूक टाळण्यासाठी योग्य माहिती असणे आवश्यक आहे.

# डोंगरफोड्यांवर आता थेट प्रहार

## खाणकाम अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे

### राज्य सरकारचा खाणकाम धोरणात मोठा बदल: जिल्ह्यालाही मोठा फायदा होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती**

अवैध उत्खनन, डोंगरफोड आणि नियमबाह्य स्टोन क्रशरमुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सरकारने खाणकाम धोरणात मोठा बदल घडवून आणला आहे. ५०० ते २००० ब्रासपर्यंतच्या खाणकामाच्या परवानग्यांचे अधिकार तहसीलदार व प्रांताधिकारी स्तरावरून काढून घेतले असून, हे अधिकार आता थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवले गेले आहेत. यामुळे निर्णयप्रक्रिया वेगवान होईल आणि भ्रष्टाचाराला लगाम घालता येईल. राज्यभर डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली लागू करून रात्रीच्या उत्खननावर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. भंडारा जिल्ह्यातही याचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे, जेथे वैनगंगा नदीकाठावरील अवैध उत्खननाने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या थेट देखरेखीखाली 'खाणकाम नियंत्रण सेल' उभारण्यात येईल. या सेलमध्ये ५ सदस्यांचा समावेश असेल – एक खाण अधिकारी, पर्यावरण तज्ज्ञ, पोलिस निरीक्षक, महसूल अधिकारी व डिजिटल तज्ज्ञ. सेल सर्व परवानग्या, तक्रार निवारण व तपासणी करेल.महाराष्ट्र खाण विभागाच्या 'महा–खाण' पोर्टलद्वारे डिजिटल ट्रॅकिंग सुरू होईल. डोंगरफोड आणि नियमबाह्य स्टोन क्रशरमुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सरकारने खाणकाम धोरणात मोठा बदल घडवून आणला आहे. प्रत्येक खाणीत जीपीएस ट्रॅकर बसवून उत्खननाची माहिती प्रत्येक तासाला अपडेट होईल. जिल्ह्यात अनेक खाणींवर हे प्रथम लागू होईल, ज्यामुळे अवैध ट्रक पकडणे सोपे होईल.



### खाणकामाचे अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांकडे



राज्य शासनाच्या नव्या आदेशानुसार, ५०० ब्रासपेक्षा जास्त पण २००० ब्रासपर्यंतच्या खाणकाम परवानग्यांसाठी आता तहसीलदार किंवा प्रांताधिकाऱ्यांना अधिकार राहणार नाहीत. हे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांच्याकडे येतील. यापूर्वी तहसील स्तरावर परवानग्या देताना अनेक त्रासदायक प्रक्रिया होत्या, ज्यामुळे उशीर होत असे. आता जिल्हाधिकाऱ्यांच्या एकाच कार्यालयातून हे काम होईल, ज्यामुळे ३० दिवसांत परवानगी मिळेल.


# शेतकऱ्यांना आता कांदा बियाणे हाच एकमेव आधार

## सोयाबीन उत्पादक तोट्यात : कपाशी व तुरीचे अपेक्षित उत्पन्न नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती**

चालू वर्षी अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले दरही वाढले नाहीत. परिणामी संपूर्ण विदर्भातील सोयाबीन उत्पादक शेतकरी हा तोट्यात गेला , तर कपाशी व तुर यांचे अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही व सरकारच्या हमीभावापेक्षा कमी दराने माल विकण्याची वेळ आल्याने ह्या पिकापासून शेतकऱ्यांना म्हणावा असा लाभ झाला नाही. अशी बिकट परिस्थिती पाहता विदर्भातील शेतकऱ्यांना आता कांदा बीज उत्पादन हाच एकमेव आधार राहिला आहे, अशा भावना जाणकार शेतकरी व्यक्त करीत आहेत. विदर्भ व मराठवाड्यातील काही पट्ट्यात उन्हाळी हंगामामध्ये कांदा बियाण्याची बीज उत्पादन घेऊन बियाणे कंपन्यांना बियाणे पुरवठा केले जाते, बियाणे खरेदी हमीभाव असल्याने बरेचशे शेतकरी या पिकाकडे वळलेले आहेत. साधारणपणे ४०० ते ५०० कोटी रुपयांची उलाढाल यातून होत असते. यावर्षी नेहमीप्रमाणे लागवड झाल्यापासून मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस व गारपिटीने पिकाची मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान केलेली आहे. सर्व



भागातील अंदाज घेतला असता साधारणपणे बियाणे उत्पादनामध्ये वीस ते पंचवीस टक्के घट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही प्रमाणात बियाण्याचे दर वाढून शेतकरी बांधवांना दोन पैसे मिळण्याची अशा निर्माण झाली आहे. मागील काही वर्षापासून बियाण्याची दर हे ५० ते ६० हजार रुपये प्रति क्विंटल याप्रमाणे राहिलेले आहेत, परंतु खतांचे व औषधाची वाढलेली दर व मजुरीचा वाढता खर्च लक्षात घेऊन काही नामांकित कंपन्यांनी या अगोदरच ७० हजार रुपये प्रति क्विंटल प्रमाणे शेतकऱ्यांसोबत करार केलेली आहेत. काही कंपन्या या कांदा वाटप करते वेळेस नामांकित कंपन्या ज्याप्रमाणे दर देतील

त्याप्रमाणे आम्ही शेतकऱ्यांना दर देऊ असे सांगत असतात व त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना पेमेंट करत असतात. परंतु यावर्षी काही कंपन्यांनी ५० हजार ५५ ते ६० हजार अशा प्रकारे दर देण्याची कुजबूज चालू आहे. या भावामध्ये शेतकऱ्यांना बीज उत्पादन करणे परवडत नाही. म्हणून वाढता उत्पादन खर्च लक्षात घेता शेतकऱ्यांनी सरसकट सत्तर हजार रुपये दर मिळावा अशी मागणी केलेली आहे. त्यामध्ये काही कंपन्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत विचार करण्याची हमी दिलेली आहे. तरी परिसरातील शेतकरी बांधवांकडून बियाणे देते वेळेस हमीभावाबाबत खात्री करून मगच बियाणे कंपनीकडे जमा करावे, असे आव्हान परिसरातील कृषी मित्र शेतकऱ्यांनी केले आहे. याबरोबरच सर्व कंपन्यांनी शेतकऱ्यांना ७० हजार रुपये प्रतिक्विंटल हमीभाव देऊन प्रतिकूल परिस्थितीमध्ये कांदा बीज उत्पादक शेतकऱ्यांना सहकार्य करावे अशी अपेक्षा बीज उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# संपामुळे नागरिकांचे हाल: तहसील कार्यालयातून दाखले मिळत नाही- ग्रामस्थ त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती**

जुनी पेन्शन योजना लागू करा, या प्रमुख मागणीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप तिसऱ्या दिवसाकडे वाटचाल करित आहे. या आंदोलनामुळे तहसील कार्यालयातून प्राप्त होणारे दाखले नागरिकांना मिळणे बंद झाले असून आरोग्यसेवासुद्धा कोलमडली आहे. त्यामुळे नागरिकांना हाल सहन करावे लागत आहे.



दरम्यान संपाबद्दल तोडगा काढण्यासाठी आज, बुधवारी मुंबईत मुख्य सचिवांसोबत सुकाणू समितीची बैठक पार पडली.

यावेळी १८ मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. परंतु त्यातून कोणताही ठोस उपाय बाहेर आला नाही. त्यामुळे संप उद्या, गुरुवारीही सुरुच राहणार असल्याचे समन्वय समितीचे निमंत्रक तथा राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना अमरावती शाखेचे सरचिटणीस डी. एस. पवार यांनी 'दिव्य मराठी'ला सांगितले. दरम्यान बुधवारी सकाळी त्यांच्याच नेतृत्वात येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये निदर्शने करण्यात आली. कर्मचाऱ्यांनी आज गुरुवारी सुद्धा अशीच एकजूट कायम ठेऊन आंदोलन यशस्वी करावे, असे आवाहनही पवार यांनी केले आहे.

# शिवाजी कोण होता? पुस्तकावरून नवा वाद

## आमदार संजय गायकवाड यांची धमकीची ऑडिओ क्लिप व्हायरल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३बुलढाणा–** बुलढाण्याचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी केलेल्या कथित धमकीच्या फोन कॉलमुळे पुन्हा एकदा वाद निर्माण झाला आहे. दिवंगत प्राध्यापक गोविंद पानसरे यांच्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून हा वाद पेटला असून संबंधित ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे.

माहितीनुसार, सुमारे ३७ वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या या पुस्तकाच्या शीर्षकावर आक्षेप घेत आमदार गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन केल्याचा आरोप आहे. या संभाषणात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केल्याचा आरोप करत शिवीगाळ केल्याचे आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचे ऑडिओ क्लिपमध्ये ऐकू येत असल्याचा दावा केला जात आहे.



या कथित संभाषणात गायकवाड यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत, शिवाजी महाराजांना एकेरी संबोधणारे कोण? असा सवाल उपस्थित केला आहे. तसेच संबंधित लेखकाचा उल्लेख करत आक्रमक भाषा वापरल्याचेही सांगितले जात आहे.

दरम्यान, प्रकाशक प्रशांत आंबी यांनी आपली बाजू मांडताना सांगितले की, हे पुस्तक १९८८ मध्ये प्रकाशित झाले असून त्यामागे कोणताही अवमान करण्याचा हेतू नाही. आपण आधी पुस्तक वाचा, मग भूमिका घ्या, असे सांगण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, संभाषणादरम्यान गायकवाड यांनी आपले म्हणणे ऐकून न घेतल्याचा आरोप त्यांनी केला.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना आमदार गायकवाड यांनी संबंधित ऑडिओ क्लिप 'तोडून–मोडून' व्हायरल केल्याचा दावा केला आहे.

पुस्तकातील शीर्षक आणि मजकूर हा शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी छेडछाड करणारा आहे. महाराजांना एकेरी भाषेत संबोधणे असह्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, मी जे बोललो त्यात काहीही चुकीचे नाही, असेही ते म्हणाले. या घटनेमुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात पुन्हा एकदा चर्चा रंगली असून अभिव्यक्ती स्वातंत्र्य, ऐतिहासिक लेखन आणि सार्वजनिक व्यक्तींच्या भाषाशैलीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

# इंटरनेटसाठी मोबाईल वापरता की लॅपटॉप ?

## ३३ प्रश्नांचा 'भडीमार' टाळण्यासाठी 'स्वगणना'

### प्रगणकाची वाट न पाहता घरबसल्या नोंदणीची संधी घराची कुंडली मांडणारी पहिली 'डिजिटल' जनगणना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–** तुमच्या घरात टीव्ही आहे की नाही? इंटरनेटसाठी मोबाइल वापरता की लॅपटॉप? स्वयंपाकाला गॅस आहे की सरपण?, सायकल, दुचाकी की चारचाकी? आगामी जनगणनेत अशा ३३ प्रश्नांच्या भडीमाराला तुम्हाला सामोरे जावे लागणार आहे. मात्र, प्रगणक घरी आल्यावर प्रश्नांची उत्तरे देत बसण्यापेक्षा, ही सर्व माहिती ीश.लशपीींी. सेीं.ळप या पोर्टलवर स्वतःच भरुन आपली 'स्व–गणना' स्वतःच करता येणार आहे.नेहमीच्या जनगणनेत प्रगणक घरी कधी येतील, याची खात्री नसते. अनेकदा घरातील जाणकार व्यक्ती हजर नसल्यामुळे माहिती चुकीची नोंदवली जाते. हा सर्व मनस्ताप टाळण्यासाठी यंदा 'स्व–गणना' हा पर्याय देण्यात आला आहे. १ मे ते १५ मे या काळात नागरिक आपल्या मोबाइलतरून किंवा संगणकावरून ही माहिती भरू शकणार आहेत. त्यामुळे प्रगणकालाही सोईचे होणार आहे.

**असे आहेत जनगणनेचे टप्पे**



१ मे ते १५ मे : ऑनलाइन 'स्वगणना' करण्याचा कालावधी.

१५ मे ते जून २०२६ : प्रगणक घरोघरी जाऊन मोबाइल ॲपद्वारे घरगणना करतील.

फेब्रुवारी २०२७ : प्रत्यक्ष लोकसंख्या गणना सुरू होईल.

कलर बॉक्सअशी करा स्वगणना

ीश.लशपीींी.सेीं.ळप या पोर्टलवर जा, मोबाइल नंबरवर येणाऱ्या ओटीपीद्वारे लॉगिन करा, ३३ प्रश्नांची अचूक उत्तरे स्वतःच टाइप करा, माहिती सबमिट केल्यावर एक 'युनिक आयडी' मिळेल, तो जपून ठेवा. जेव्हा प्रगणक घरी येतील, तेव्हा त्यांना फक्त हा आयडी दाखवा. ते तुमच्या माहितीची पडताळणी करून शहनिशा करणार आहेत.

### काय विचारले जाणार ३३ प्रश्नांमध्ये?

घराची स्थिती : इमारत व घर क्रमांक,घराच्या भिंती व छतासाठी वापरलेले साहित्य (सिमेंट, विटा की माती), घराचा वापर आणि सध्याची स्थिती.

**कुटुंबाची माहिती : एकूण व्यक्तीची–** संख्या, कुटुंब प्रमुखाचे नाव, लिंग, कुटुंबप्रमुखाचा प्रवर्ग, घराच्या मालकी हक्काची, खोल्याची संख्या, कुटुंबातील विवाहित जोडप्यांची संख्या.

**उपलब्ध सुविधा : पिण्याच्या पाण्याचा–** मुख्य स्रोत, प्रकाशाचा मुख्य स्रोत, शौचालयाची उपलब्धता, शौचालयाचा प्रकार, सांडपाणी सोडण्यासाठी जोडलेली व्यवस्था, स्नानगृहाची उपलब्धता आणि एलपीजी–पीएनजी जोडणी, स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे मुख्य इंधन.


मनोरंजन व डिजिटल साधणे : रेडिओ, दूरचित्रवाणी, इंटरनेट, लॅपटॉप, संगणक, मोबाइल.

वाहने कोणती : सायकल, दुचाकी, कार, चारचाकी

कुटुंबात सेवन केले जाणारे मुख्य धान्य: तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका.–

# रविवारी चौथी–सातवी शिष्यवृत्ती परीक्षा

## दोन सत्रांत आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा येत्या रविवारी, २६ एप्रिल रोजी घेण्यात येणार आहे. यंदापासून पाचवी–आठवीऐवजी चौथी व सातवीसाठी ही परीक्षा आयोजित करण्यात येत असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद अमरावती प्रिया देशमुख यांनी दिली.ही परीक्षा दोन सत्रांत होणार असून प्रथम सत्र सकाळी ११ ते १२.३० या वेळेत भाषा (५० गुण) व गणित (१०० गुण) तर द्वितीय सत्र दुपारी २ ते ३.३० या वेळेत तृतीय भाषा (५० गुण) व बुद्धिमत्ता चाचणी (१०० गुण) घेण्यात येईल. मराठीसह उर्दू, हिंदी, गुजराती, इंग्रजी, तेलगू व कन्नड अशा सात माध्यमांत परीक्षा होणार आहे.निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे दरमहा ५०० व ७५० रुपयांची शिष्यवृत्ती तीन वर्षे दिली जाणार आहे.

सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

